**<u>दिवाणी चौकशी अर्ज क्र. ४३/२०२४</u>**

**निशणी २३ पुढे सुरु**

जाहेदाबी वि. छनोबी

**<u>सामनेवाले क्र. २–अ ते २–ड तर्फे पुढील उलट तपास श्री के.बी. कदम वकील यांच्या मार्फत.</u>**

२. मला माहित नाही की सामनेवाला क्र ४ हा सन २०१४ सालीच वारलेला आहे. मी मागिल १० ते १२ वर्षापासून जानेफळ गावी येथे राहते. जानेफळ ते म्हस्की या गावातील अंतर किती आहे ते मला सांगता येणार नाही, पण ते एकमेकांपासुन खुप दुर आहे. म्हस्की हे गाव वैजापुर गावाच्या दक्षिण दिशेस आहे व जानेफळ हे उत्तर दिशेस २० कि.मी अंतरावर आहे. मी सन २००६ पासून वैजापुर न्यायालयात येत असते. मी वैजापुर न्यायालयात खावटी मिळण्यासाठी पतीच्या विरूध्द खावटी अर्ज दाखल केला होता. पण त्याचे वर्षे मला सांगता येणार नाही. कागद पत्राप्रमाणे मी सन २०१२ वर्षी एम.ए.नं.२०२/२०१२ हा मनसुफच्या विरुध्द दावा दाखल केला होता.

३. हे म्हणणे खरे आहे की, मुलाने मला एकरक्कमी रु.७०,०००/– (अक्षरी सत्तर हजार रुपये) व दर महा ३,०००/– (अक्षरी तीन हजार रुपये) द्यावेत असा खावटी आदेश न्यायालयाने केलेला होता. हे म्हणणे खरे की पठाण वकिलामार्फत खावटी वसुली साठी अर्ज मी दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर वसुली अर्जात मी रुपये सत्तर हजार रोखीने घेउन रक्कम रुपये द.म. तीन हजार या रक्कमेकरीता मुलासोबत तडजोड केली होती. रेकॉर्ड प्रमाणे सदर वसुली अर्जाचा नंबर १४/२०१४ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खावटीचे प्रकरण मी मुलगा मनसुब सोबत तडजोडीने मिटवुन टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर तडजोडीत दिवाणी दावा क्र.२४५/२००६ या मध्ये मला मिळालेला हिस्सा मी तडजोडीने मिटवला होता. हे म्हणणे खरे नाही की,मी खावटीचे प्रकरण तडजोडीने मिटवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर तडजोडी प्रमाणे मला म्हस्की गावातील गट क्र. ९४ मधील ९५ आर. क्षेत्र

देण्यांत आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, तडजोडीमुळे मी दाखल केलेली आर.डी क्र.२१/२०१४ मागे घेण्यांचे ठरवले. खावटी व आर.डी.चे प्रकरणांमध्ये माझे वकील हे पठाण वकील होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनाक १७.०१.२०१५ रोजीच्या तडजोडीप्रमाणे मला जमीन मिळाली असल्यामुळे मी ते प्रकरण मागे घेतले आहे.

४. माझ्या खावटी हक्काबाबत पुढे काय झाले ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तडजोडीप्रमाणे ९५ आर क्षेत्र मला ताब्यात देण्यांत आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला जमीन मिळालेली असल्यामुळे मी खावटीचे प्रकरण व दिवाणी दरखास्त ही दोन्ही प्रकरणे मागे घेतलेली आहे. मी शेख रज्जु या इसमास ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मिळालेली जमीन ही शेख रज्जु या इसमासोबत विक्री करण्यांचा करार मी केलेला होता. मी व पठाण वकील हल्ली ऐकमेकासोबत बोलत नाही. मागील पाच ते सहा वर्षापासुन मी पठाण वकीला सोबत बोलत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमीन विक्रीचे पैसे मी व पठाण वकिलांनी निम्मे–निम्मे करावयाचे ठरवीले होते. हे म्हणणे खरे नाही की, पैसे देउ लागु नाही म्हणुन मी शेख रज्जु सोबत केलेला जमीन विक्री सौदा रद्द केला.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी शेख रज्जु याच्या सोबत माझा विक्री सौदा रद्द झाल्यानंतर मुलगा मनसुब याने ती मिळकत खरेदी करण्यांचा मनोदय व्यक्त केला होता व तशी विनंती माझ्याकडे त्याने केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मुलगा मनसुबने मला खरेदी मोबदला रक्कम रुपये ७५००००/– (अक्षरी सात लाख पन्नास हजार रुपये) दिल्यामुळे ती जमीन त्याच्याच नांवे राहिली. हे म्हणणे खरे नाही की, जमीन ही मुलगा मनसुबच्याच नांवे महसुल अभिलेखात असल्यामुळे त्याचा वेगळा खरेदी व्यवहार त्याने मला पैसे देऊन देखील झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत करुन देण्यांसाठी मिळकत माझ्या नावे महसुल अभिलेखात नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात झालेल्या तडजोडीबाबत सामनेवाल्याने सर्व कागदपत्र दाखल केलेली असुन त्याबत मला पुर्ण माहिती आहे. माझ्या लक्षात नाही की, मध्यस्थीने तडजोडीसाठी

प्रकरण दिवाणी न्यायालय व.स्तर शिंदे साहेब यांच्याकडे पाठविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मध्यस्थीमध्ये मी तडजोड करुन ती मान्य करुन माझे खावटीचे प्रकरण व दिवाणी दरखास्त ही दोन्ही दावे मागे घेतले होते.

६. मला माझी जमीन मिळावी या करीता मी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः वकिला मार्फत हजर राहुन तडजोडीची कार्यवाही पुर्ण केलेली होती व आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहुन तडजोडीने माझी प्रकरणे मागे घेउन मुलगा मनसुबने मला दिलेले जमिनीचा मोबदला रक्कम/पैसे देखील खर्च करुन सामनेवाल्यांना त्रास देण्यांसाठी प्रस्ततचा अर्ज दाखल केला आहे. मला मुलगा मनसुबने फसवलेले आहे. मला त्याने माझ्या हिश्याची जमीन दिलेलीच नाही. सामनेवाल्याने दाखल केलेली कागदपत्र ही खोटी अशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तडजोडीमध्ये माझ्याकडुन न्यायालयाने सदर तडजोडीची माझ्याकडुन पडताळणी करुन ती स्विकारलेली आहे. सन २०१५ पासुन ते आजतागायत माझी फसवणुक झाली म्हणुन प्रस्तुत प्रकरण खेरीस वेगळी कार्यवाही मी सामनवाले विरुध्द केलेली नाही. साक्षीदार स्वतःहुन पुढे सांगते की, मी उच्च न्यायालयात दाद मागितली होती.

७. मला पठाण वकिलांकडुन फसवण्यांत आले असे कथन मी मा. उच्च न्यायालयासमोरील प्रकरणामध्ये केलेले आहे. पठाण वकील हजर झालेच नसल्यामुळे मी त्यांच्या विरुध्द पुढील कार्यवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पठाण वकीलांनी मला फसवलेच नसल्याने मी त्यांना त्या प्रकरणांत त्यांना पक्षकार करण्याचा आदेश कोर्टाचा असताना तसे न करता ते प्रकरण मागे घेतले. हे म्हणणे खरे नाही की, पठाण वकिलांकडुन माझी कोणतीही फसवणुक झालेली नसल्याने मी त्यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई अनुसरलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पठाण वकिलांनी मला फसविले नसल्याने प्रस्तुत प्रकरणात मी त्यानां पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पठाण वकीलाच्या गैरहजेरीत मी त्याच्या विरुध्द खोटे आरोप करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुलगा मनसुब याला हैराण करण्यांसाठी खोटी कार्यवाही या अर्जाद्वारे त्याचे

विरुध करुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>सामनेवाले क्र. ३ तर्फे उलट तपास श्री पी.आर.बत्तासे वकील यांच्या मार्फत.</u>**

८. मला कोणताही आजार नाही. मला विस्मरणाची देखील बिमारी नाही. मला माहित नाही की, सामनेवाला क्र. ४ हा मयत इसम आहे. सामनेवाला क्र. ४ चे नांव कागदपत्रमध्ये असल्याने त्यास या प्रकरणांत पक्षकार केले आहे. नउ वर्षाचा विलंब माफ करण्यांसंदर्भात मी अर्ज दाखल केला नाही.

९. उर्वरीत उलट तपास सामनेवाले क्र. २–अ ते २–ड यांच्या वतीने करण्यात आलेला तपास सामनेवाले क्र. ३ ने स्विकारला. हे म्हणेणे खरे नाही की, मला पैसे व जमिन मिळालेली असतांना पैशांच्या लालसेपोटी मी खोटे प्रकरण सामनेवाले विरुध्द दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2024.11.16 12:23:25 +0530

(आर. एम. कराडे),
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
वैजापुर.

दिनांक – २७.०९.२०२४.